मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दिनांक २६ नोव्हेंबर २०२३। पान १

# गायीचे रक्षण केलीयाचे पुण्य बहूत!

## मोशीत देशातील सर्वात मोठे देशी गोवंश-अश्व पशू प्रदर्शन



**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** भारत हा महाशक्ती झाला पाहिजे, असे म्हटले जाते. त्यासाठी गोशक्ती सक्षम झाली पाहिजे. भारत जेव्हा स्वतंत्र झाला. गायीच्या गोमूत्राला जुनागड विद्यापीठाने ‘लिक्विड गोल्ड’ असे नाव दिले. गायीचे शेणसुद्धा मौलवान आहे. ‘‘गायीचे रक्षण केलीयाचे पुण्य बहूत आहे’’ असे छत्रपती शिवाजी महाराज यांचे वचन आहे. असे असतानाही महाराष्ट्रात गोहत्या केली जाते, ही बाब चिंताजनक आहे. त्यामुळे आमदार महेश लांडगे आणि सहकाऱ्यांनी ‘‘गोहत्यामुक्त महाराष्ट्र’’ निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन अखिल भारतीय कृषी गोसेवा संघाचे अध्यक्ष मिलिंद एकबोटे यांनी केले. अखिल भारतीय कृषी गोसेवा संघाचे अध्यक्ष मिलिंद एकबोटे, शिवप्रतिष्ठान हिंदूस्थानचे पुणे जिल्हा प्रमुख संजय जठार, विधान परिषदेचे आमदार गोपिचंद पडळकर यांच्याहस्ते मोशी येथील आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्राच्या मैदानावर देशी गोवंश व अश्व पशू प्रदर्शन व आरोग्य शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी माजी महापौर राहुल जाधव, माजी पशूसंवर्धन आयुक्त विश्वास भोसले, पशू संवर्धन विभागाचे सहआयुक्त, पुणे डॉ. संतोष पंचभोर, जिल्हा पशूसंवर्धन उपायुक्त डॉ. अंकूश परिहार, अखिल भारतीय बैलगाडा संघटनेचे संदीप बोदगे, अण्णासाहेब मगर बँकेचे चेअरमन नंदू लांडे, माजी स्थायी समिती सभापती विलास मडिगेरी आदी मान्यवर उपस्थित होते. आमदार गोपिचंद पडळकर म्हणाले की, आमदार महेश लांडगे यांचे व्यक्तीमत्व बहुआयामी आहे. हिंदूप्रेमी, बैलगाडा प्रेमी, गोप्रेमी, कुस्तीप्रेमी असे अनेक पैलू त्यांचे आहेत. त्यांचा हिंदुत्ववादी चेहरा दिवसेंदिवस उजळतो आहे. अत्यंत धाडसाने ते भूमिका घेतात. त्याचे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात स्वागत होते. देशी गोवंश व अश्व प्रदर्शन हे गोवंश वाचवण्याच्या चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान देणार आहे. महाराष्ट्रभरातून तसेच देशातील विविध राज्यातून साडेपाचशेहून अधिक शेतकरी व गोवंशपालक उपस्थित होते. या पशुप्रदर्शनामध्ये खिल्लार, देवणी, लालकंधारी, थारपारकर, म्हैस, रेडा, कांकरेज, गीर, डांगी, साहिवाल, पुंगनूर, मालनाड गिड्डा, कपिला गाय बैल तसेच मारवाडी व भीमथडी अश्व मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय असे क्रमांक काढण्यात येणार आहेत. पहिल्या क्रमांकाच्या गोवंश आणि पशूंचे ‘रॅम्प वॉक’ होणार आहे, असा प्रयत्न भारतात प्रथमच होत आहे.

### आमदार लांडगे यांना ‘हिंदूत्व शौर्य’

**» आमदार लांडगे यांनी गोसंवर्धन आणि प्रखर हिंदूत्वाची भूमिका घेतली आहे. हिंदूत्वाच्या मुद्यावर विधानसभा आणि सार्वजनिक जीवनात त्यांची आक्रमक भूमिका महाराष्ट्रातील हिंदूत्ववादी कार्यकर्ते, नागरिकांसाठी प्रेरणा देणारी आहे. त्यामुळे यावर्षीचा ‘हिंदूत्व शौर्य’ पुरस्कार त्यांना जाहीर करतो, अशी घोषणा यावेळी अखिल भारतीय कृषी गोसेवा संघाचे अध्यक्ष डॉ. मिलिंद एकबोटे यांनी केली. डिसेबर-२०२३ मध्ये पुण्यात हिंदूत्ववादी संघटना, संत-महात्मे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमामध्ये आमदार लांडगे यांना हा पुरस्कार व सोन्याचे कडे देवून गौरविण्यात येईल, असेही डॉ. मिलिंद एकबोटे यांनी सांगितले.**

# आठ वर्षीय सुरभी चंद्रपूरकरांना सांगणार मुखोद्गत पारायण

## सुरभी हिला गजानन महाराज यांचे २१ अध्याय मुखापथ

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिंपरी-चिंचवड येथील अवघ्या आठ वर्षांची सुरभी ढगे ही गजानन भक्तांना मुखोद्गत पारायण सांगणार आहे. सुरभी हिला गजानन महाराज यांचे २१ अध्याय मुखापथ आहे. विशेष म्हणजे भविष्यात तिला डॉक्टर, अभियंता किंवा अधिकारी व्हायचे नाही तर गजानन महाराज यांचे पारायण सांगायचे आहे. श्री गजानन महाराज ट्रस्ट आणि श्री गजानन गौरव गाथा समितीच्यावतीने वडगाव येथील गजानन महाराज मंदिर परिसरात पारायणाचे आयोजन २४ ते २६ नोव्हेंबरपर्यंत दररोज सायंकाळी ५ ते रात्री ८ वाजतापर्यंत पारायण आयोजित केले आहे. कुतुहलाची बाब म्हणजे पिंपरी-चिंचवड येथील अवघ्या आठ वर्षांची सुरभी ढगे हिला गजानन महाराज यांचे पारायण मुखोद्गत



आहे. अवघ्या चार वर्षापासून सुरभी घरी आईसोबत पारायण करीत होती. सुरभी ढगे ही आता इयत्ता दुसरीत शिक्षण घेत आहे. आई भाग्यश्री ढगे या फॅशन आर्टिस्ट आहे. वडिल सुनील ढगे हे इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअर आहेत. मोठा भाऊ शंतनु हा अभियांत्रिकीचे शिक्षण घेत आहे. घरातील सर्वच मंडळी गजानन महाराजांची भक्ती करतात. करोना काळात सर्वत्र लॉकडाऊन असताना सुरभीच्या घरात सर्वजन रोज श्री गजानन विजय ग्रंथाचा एक अध्याय घेत होते. सुरभी तेव्हा सव्वा पाच वर्षांची होती. तिने तेव्हा आईकडे पारायण घेण्याचा हट्ट केला. तिला अक्षर ओळख नसल्यामुळे पारायण कसे करायचे ही अडचण होती. तिला विद्याताई पडवळ यांचे यु-ट्युबवरील अध्याय लावून देत. ती दररोज अध्याय ऐकत होती. वयाच्या साडेसातव्या वर्षी सुरभीला संपूर्ण २१ अध्याय मुखपाठ झाले. वयामुळे ती पूर्ण पारायण करत नव्हती. पण शक्य तेवढे पारायण करायची. तिला शेगावला पूर्ण पारायण सांगायचे होते. अलीकडेच पाच हजार गजाननभक्तांसमोर तिने शेगावला पहिल्यांदा पूर्ण पारायण सांगितले. इतक्या कमी वयात सुरभी अतिशय सफाईदारपणे पारायण सांगत असल्याचे पाहुन अनेकांना आश्चर्य वाटत होते.

# डुडूळगाव परिसरातील पाणीपुरवठा होणार सक्षम

## आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते पाण्याच्या टाकीचे लोकार्पण

**पिंपरी । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी- चिंचवड महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून डुडूळगाव येथे तब्बल १५ लक्ष लीटर क्षमतेची पाण्याची टाकी उभारण्यात आली. त्यामुळे पाणी पुरवठा सक्षम होणार असून, स्थानिक नागरिक आणि ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने प्रभाग क्रमांक ३ मधील डुडूळगाव येथे पाण्याची टाकी उभारण्यात आली आहे. त्याचे लोकार्पण आज करण्यात आले. यावेळी रमेश वहिले, योगेश तळेकर, सचिन तळेकर, चिखली-मोशी-चऱ्होली हाउसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे, राजेश सस्ते, गणेश सस्ते, वंदना आल्हाट, विक्रम वहिले, सागर वहिले, दादा पवार, सचिन पवार, महापालिकेचे कार्यकारी अभियंता रामनाथ टकले, कनिष्ठ अभियंता सुधाकर चव्हाण, विजय लाडे आदी उपस्थित होते. या नवीन जलकुंभामुळे धायकरवस्ती, राजमाता कॉलेज परिसर, दत्तनगर, माउलीनगर, एसपी कॉलेज परिसर, ऑस्ट्रिया सोसायटी परिसर, डुडूळगाव गावठाण आदी भागाचा पाणीपुरवठा सक्षम होणार आहे.



> “ २०१७ मध्ये झालेल्या महापालिका निवडणुकीदरम्यान ‘भोसरी व्हीजन-२०२०’ अभियानांतर्गत समाविष्ट गावांतील पाणीपुरवठा सक्षम करण्याचा संकल्प आम्ही केला होता. महापालिकेच्या माध्यमातून डुडूळगाव, चोविसावाडी, वडमुखवाडी व चऱ्होली आदी भागांमध्ये मुख्य जलवाहिनी आणि आठ ठिकाणी पाण्याच्या टाक्या उभारण्यात येणार आहेत. तसेच, आंद्रा, भामा आसखेड प्रकल्पामुळे समाविष्ट गावांचा पाणी प्रश्न सुटण्यास मदत होईल, असा विश्वास आहे.
>
> – महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# कर्करोगग्रस्त रुग्णांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे उपचार!

## लवकर निदान झाले तर कॅन्सर शंभर टक्के बरा होतो : वाटेगावकर

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** लवकर निदान झाले तर कॅन्सर शंभर टक्के बरा होतो, तसेच प्रत्येकाने आहार विहार पद्धतीत दारू, तंबाखू सारख्या व्यसनांपासून दूर रहावे, तेलकट आणि मसालेदार पदार्थ टाळावेत आणि नियमित व्यायाम करावा या त्रीसुत्रीचा अवलंब करून कॅन्सर पासून दूर राहता येईल असे प्रतिपादन एमओसी पिंपरी सेंटरचे वरिष्ठ कर्करोग तज्ञ डॉ. रविकुमार वाटेगावकर यांनी केले. पिंपरी येथे रविवार (दि.२६) पासून सुरू होणाऱ्या एमओसीचे (मुंबई ओंको सेंटर) उद्घाटन जागतिक कर्करोग तज्ञ डॉ. भरत पारेख यांच्या हस्ते होणार आहे. याची माहितीसाठी देण्यासाठी पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत डॉ. वाटेगावकर बोलत होते. यावेळी डॉ. रितू दवे उपस्थित होत्या.




यावेळी डॉ. वाटेगावकर यांनी सांगितले की, पिंपरी मध्ये कर्करोगग्रस्त रुग्णांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे उपचार वाजवी दरात एमओसी मध्ये मिळणार आहेत. गेल्या पाच वर्षात नावारूपाला आलेली ही संस्था आहे. एमओसीचे महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये १४ कॅन्सर केअर सेंटर आणि ४ कॅन्सर क्लिनिक्स उपलब्ध आहेत. वर्ष २०२१ मध्ये एमओसीने मॉडेल कॉलनी, पुणे येथे जिल्ह्यातील पहिले कॅन्सर केंद्र सुरू केले. उदात्त हेतू, उपचार कौशल्य आणि तंत्रज्ञान यांचा सुरेख मेळ साधता आल्यामुळे एमओसीने गेल्या पाच वर्षात पुण्यासह महाराष्ट्रात सुमारे १,२५,००० हून अधिक कर्करोगग्रस्तांना उपचार दिले आहेत. आता पिंपरी चिंचवड येथे पुणे जिल्ह्यातील दुसरे कॅन्सर केअर केंद्र पिंपरी मेट्रो स्टेशन लगत गेरास इम्पेरियल ओएसिस येथे अध्ययावत सुविधांनी परिपूर्ण असे सुरू होत आहे. या ठिकाणी रुग्णांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे उपचार, वाजवी दरात घेता येतील. उपचार घेत असताना येणारा आर्थिक भार कमीत कमी करावा असे एमओसी केंद्राचे ध्येय आहे. कर्करोगास प्रतिबंध कसा करावा तसेच कर्करोगाचे लवकर निदान आणि उपचारांच्या दृष्टीने त्याचे महत्त्व यासंबंधी जनजागृती करण्यासाठी देखील एमओसी पिंपरी सेंटर प्रयत्नशील राहील असेही डॉ. वाटेगावकर यांनी सांगितले. लहान मुलांमध्ये होणारे कॅन्सर ८० ते ९० टक्के बरे होतात. कॅन्सरचे निदान होणे हे रुग्णांसाठी एकदम धक्कादायक असते, त्यासाठी तज्ञ डॉक्टरांकडून उपचार व समुपदेशक तज्ञांकडून सल्ला घ्यावा.

### ४ कॅन्सर क्लिनिक्स उपलब्ध

» पिंपरी येथे रविवार (दि.२६) पासून सुरू होणाऱ्या एमओसीचे (मुंबई ओंको सेंटर) उद्घाटन जागतिक कर्करोग तज्ञ डॉ. भरत पारेख यांच्या हस्ते होणार आहे. याची माहितीसाठी देण्यासाठी पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत डॉ. वाटेगावकर बोलत होते. यावेळी डॉ. रितू दवे उपस्थित होत्या. यावेळी डॉ. वाटेगावकर यांनी सांगितले की, पिंपरी मध्ये कर्करोगग्रस्त रुग्णांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे उपचार वाजवी दरात एमओसी मध्ये मिळणार आहेत. गेल्या पाच वर्षात नावारूपाला आलेली ही संस्था आहे. एमओसीचे महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये १४ कॅन्सर केअर सेंटर आणि ४ कॅन्सर क्लिनिक्स उपलब्ध आहेत. वर्ष २०२१ मध्ये एमओसीने मॉडेल कॉलनी, पुणे येथे जिल्ह्यातील पहिले कॅन्सर केंद्र सुरू केले. उदात्त हेतू, उपचार कौशल्य आणि तंत्रज्ञान यांचा सुरेख मेळ साधता आल्यामुळे एमओसीने गेल्या पाच वर्षात पुण्यासह महाराष्ट्रात सुमारे १,२५,००० हून अधिक कर्करोगग्रस्तांना उपचार दिले आहेत. आता पिंपरी चिंचवड येथे पुणे जिल्ह्यातील दुसरे कॅन्सर केअर केंद्र पिंपरी मेट्रो स्टेशन लगत गेरास इम्पेरियल ओएसिस येथे अध्ययावत सुविधांनी परिपूर्ण असे सुरू होत आहे.

# भुजबळ, जरांगेंचे अजित पवारांनी टोचले कान

## भडक भाषण न करण्याचे आवाहन



**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
काही जण वाचाळवीर म्हणावे अशा पद्धतीने बोलत असून त्यांनी बोलताना काळजी घेतली पाहिजे. सत्ताधारी, विरोधक आणि इतर कोणीही भडक भाषणे करू नयेत, अशा शब्दांत कोणाचेही नाव न घेता राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अन्न नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ आणि मराठा आरक्षणाचे आंदोलक मनोज जरांगे यांचे कान टोचले. पुणे दौऱ्यावर पत्रकारांशी बोलताना उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, 'अंतरवाली सराटीमध्ये चार जणांना अटक झाल्याची पूर्ण माहिती माझ्याकडे नाही. कायदा सुव्यवस्था राखणे पोलीस आणि सरकारची जबाबदारी आहे. आंदोलन करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे, मात्र राष्ट्रीय, सार्वजनिक संपत्तीचे नुकसान होऊ नये, यासाठी कायदे नियम केले आहेत. निष्कारण कोणाला कोणत्याही प्रकरणात गोवणे हे सरकार सहन करणार नाही. सरकार म्हणून कायदा सुव्यवस्था राखावी लागते. न्यायालयाने घालून दिलेले नियम सर्वांनी पाळणे आवश्यक आहे. सत्ताधारी, विरोधक किंवा इतर कोणीही भडक भाषणे करू नयेत.' दरम्यान, मागासवर्ग आयोगाने ४०० कोटी रुपये सरकारकडे मागितल्याची बातमी मी वाचली. मंगळवारी मुंबईत गेल्यानंतर याबाबत माहिती घेऊ. आयोगाला स्वायत्तता दिली आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळात चर्चा करून राज्याच्या हिताचा निर्णय घेतला जाईल. निवडून येण्याची क्षमता पाहून आगामी निवडणुकांत उमेदवारीचा निर्णय घेतला जाईल. सध्या चार राज्यांच्या निवडणुकांची प्रक्रिया सुरू असून त्या झाल्यानंतर लोकसभेच्या जागांबाबत चर्चा करू, असेही पवार यांनी या वेळी सांगितले. राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांची बैठक लवकरच पुण्यातील यशदा येथे घेतली जाणार आहे. मुख्यमंत्री शिंदे यांची वेळ मागितली आहे. ३१ जुलैपर्यंत पाण्याचे साठे सुरक्षित कसे ठेवता येतील, बाकी पाणी शेतीला देता येईल, त्याचा पुन्हा आढावा घेण्यात येणार आहे. सध्या राज्यात काही ठिकाणी चाऱ्याची कमतरता, पाणीटंचाई जाणवत आहे. राज्यातील ४० तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला आहे. तसेच मदत पुनर्वसन मंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील समितीने मंडलनिहाय १०२० मंडल दुष्काळसदृश्य स्थिती जाहीर केली आहे. दुष्काळ जाहीर केलेल्या ४० तालुक्यांत जी मदत दिली जाईल, ती मदत या मंडलांमध्ये दिली जाईल, असेही पवार यांनी स्पष्ट केले. दिवाळीआधी मला डेंग्यू झाला होता. या आजारात माझे १५ दिवस गेले. या काळात वृत्तपत्र आणि वृत्तवाहिन्यांत हा राजकीय आजार असल्याच्या बातम्या आल्या. मी लेचापेचा माणूस नाही. गेली ३५ वर्षे माझी मते सडेतोडपणे मांडत आहे. मात्र, दुर्दैवाने अशा बातम्या आल्या. मी मध्यंतरी गृहमंत्री अमित शहा यांना भेटायला दिल्लीला गेलो होतो, तेव्हाही तक्रार करण्यासाठी गेलो, अशा बातम्या आल्या. तक्रार करणे माझ्या स्वभावात नाही, अशा शब्दांत पवारांनी आपला त्रागा व्यक्त केला.

### आंदोलन करण्याचा अधिकार

**» अंतरवाली सराटीमध्ये चार जणांना अटक झाल्याची पूर्ण माहिती माझ्याकडे नाही. कायदा सुव्यवस्था राखणे पोलीस आणि सरकारची जबाबदारी आहे. आंदोलन करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे, मात्र राष्ट्रीय, सार्वजनिक संपत्तीचे नुकसान होऊ नये, यासाठी कायदे नियम केले आहेत. निष्कारण कोणाला कोणत्याही प्रकरणात गोवणे हे सरकार सहन करणार नाही. सरकार म्हणून कायदा सुव्यवस्था राखावी लागते. न्यायालयाने घालून दिलेले नियम सर्वांनी पाळणे आवश्यक आहे. सत्ताधारी, विरोधक किंवा इतर कोणीही भडक भाषणे करू नयेत.**

# मोदी पुन्हा सत्तेवर आले तर भारत जगातील तिसरी महासत्ता

## आपली अर्थव्यवस्था जगातील तिसऱ्या क्रमांकाची ठरेल : पियूष गोयल

**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
दहा वर्षांपूर्वी भारताची अर्थव्यवस्था डबघाईला आली होती. परदेशात भारतीय व्यापारी, उद्योजकांना फारसे महत्त्व दिले जात नव्हते. नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारली. त्यानंतर डबघाईस आलेली अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी त्यांना काम केले. कमकुवत बाजूंचा विचार न करता देशाची आर्थिक व्यवस्था सशक्त करण्यासाठी प्रयत्न केले. पायाभूत सुविधांचा विस्तार केला. त्यामुळे भारताची अर्थव्यवस्था आज जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था ठरली आहे. मोदी पुन्हा सत्तेवर आले तर, आपली अर्थव्यवस्था जगातील तिसऱ्या क्रमांकाची ठरेल, असा विश्वास केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियूष गोयल यांनी व्यक्त केला. दि पूना मर्चंट्स चेंबरकडून व्यापारमहर्षी स्व. उत्तमचंदजी तथा बाबा पोकर्णा यांच्या स्मृतीदिनानिमित्त दिल्या जाणाऱ्या आदर्श व्यापारी पुरस्काराचे वितरण गोयल यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. अरुण दांडेकर, रमेश कोंढरे, पुरुषोत्तम लोहिया, राजेश शहा, शुभम गोयल यांना व्यापारक्षेत्रातील योगदानाबद्दल पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रवीण डोके यांना आदर्श पत्रकार पुरस्कार प्रदान करण्यात




आला. ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. एस. के. जैन, लायन्स क्लबचे विजय भंडारी, चेंबरचे अध्यक्ष राजेंद्र बाठिया, उपाध्यक्ष अजित बोरा, सचिव रायकुमार नहार, प्रवीण चोरबेले, उत्तम बाठिया, ज्येष्ठ व्यापारी वालचंद संचेती, आशिष दुगड, दिनेश मेहता, नवीन गोयल यावेळी उपस्थित होते. भारतीय जनता पक्ष सत्तेवर येण्यापूर्वी देशाची अर्थव्यवस्था कमकुवत होती. अर्थव्यवस्था ढासळत असताना कोळसा, दूरसंचार घोटाळ्याचे प्रकार उघडकीस आले होते. मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाने बहुमत मिळवले. अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत करण्यासाठी वित्तीय तुटीचा दर कमी करण्यास प्राधान्य दिले. त्यामुळे गेल्या दहा वर्षात महागाईचा दर साडेचार टक्के ते सात टक्के राहिला. व्याज दर कमी झाले. परदेशी गुंतवणुकीला प्रोत्साहन दिल्याने गुंतवणुकीत मोठी वाढ झाली. निर्यातवाढीसाठी चालना देण्यात आली. सामान्यांना आत्मनिर्भर करण्यासाठी अनेक योजना राबविण्यात आल्या. समाजातील वंचित घटकांना घरे उपलब्ध करुन दिली. उज्वला गॅस योजना राबविली. अनेक महत्त्वपूर्ण योजना राहवून सामान्यांचे राहणीमान उंचावण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. भ्रष्टाचार मुक्त प्रशासनामुळे नागरिकांचा मोदी सरकारवरचा विश्वास वाढला, असे गोयल यांनी नमूद केले. मोदी पंतप्रधान झाल्यानंतर सामान्यांचा आत्मविश्वास वाढला. देशात पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण करण्यात आले. रस्ते, बंदरे बांधण्यात आली. विमानतळांची उभारणी झाली. त्यामुळे भारताची सर्व क्षेत्रात प्रगती झाली. आज आपली अर्थव्यवस्था जगात पाचव्या क्रमांकावर आहे.

# कोयनेच्या पाण्याचा वाद चिघळला

## कोयनेच्या वादावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली प्रतिक्रिया



**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** कोयना धरणाचे पाणी वीजनिर्मितीसाठी वापरण्याऐवजी सातारा, सांगली जिल्ह्यांतील नागरिकांना शेती आणि पिण्यासाठी देण्याची मागणी लोकप्रतिनिधींसह स्थानिक नागरिकांकडून होत आहे. याबाबत सामोपचाराने तोडगा काढू, अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी दिली. यंदा राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. त्यामुळे सांगली जिल्ह्यात दुष्काळाची भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. भाजपचे सांगलीचे खासदार संजय पाटील यांनी कोयनेचे पाणी शेती आणि पिण्यासाठी सोडण्याची आग्रही मागणी केली आहे. याबाबतची तक्रार त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई आणि सांगलीचे खासदार पाटील यांच्यात कोयनेतून सांगली जिल्ह्याला पाणी सोडण्यावरून वाद चिघळला आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री पवार यांनी या प्रकरणी सामोपचाराने तोडगा काढला जाईल, अशी ग्वाही शनिवारी पुण्यात दिली. दरम्यान, ससून रुग्णालयातील अंमली पदार्थांच्या प्रकरणातील दोषींवर कारवाई केली जाईल, ससून रुग्णालय किंवा पोलिसांशी संबंधित कोणताही अधिकारी, कर्मचाऱ्यांची गय केली जाणार नाही, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. ससून प्रकरणी चौकशी अहवाल आल्यानंतर या प्रकाराची पुनरावृत्ती होणार नाही, याची काळजी सरकार घेईल, ही महायुतीची भूमिका आहे, असेही पवार यांनी या वेळी सांगितले. तरूण पिढीला बरबाद करण्याचे काम अंमली पदार्थांची तस्करी करणारे करत आहेत. अशा प्रकरणांत कायद्यात बदल करण्याची गरज असून दोषींना फाशीची शिक्षा दिली गेली पाहिजे, असे माझे वैयक्तिक मत आहे. सण, उत्सव काळात दूध, पनीर किंवा मिठाईत भेसळ करणाऱ्यांनाही कठोर शासन झाले पाहिजे. जे माणसाचा विचार न करता स्वत:च्या फायद्याचा विचार करतो, अशा लोकांची गय करता कामा नये, असेही पवार यांनी या वेळी सांगितले.

### तस्करांना फाशी दिली पाहिजे

» यंदा राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. त्यामुळे सांगली जिल्ह्यात दुष्काळाची भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. भाजपचे सांगलीचे खासदार संजय पाटील यांनी कोयनेचे पाणी शेती आणि पिण्यासाठी सोडण्याची आग्रही मागणी केली आहे. याबाबतची तक्रार त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई आणि सांगलीचे खासदार पाटील यांच्यात कोयनेतून सांगली जिल्ह्याला पाणी सोडण्यावरून वाद चिघळला आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री पवार यांनी या प्रकरणी सामोपचाराने तोडगा काढला जाईल, अशी ग्वाही शनिवारी पुण्यात दिली. दरम्यान, ससून रुग्णालयातील अंमली पदार्थांच्या प्रकरणातील दोषींवर कारवाई केली जाईल, ससून रुग्णालय किंवा पोलिसांशी संबंधित कोणताही अधिकारी, कर्मचाऱ्यांची गय केली जाणार नाही, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

# पुणे: महंमदवाडी आता महादेववाडी?

## महंमदवाडी या उपनगराचे नाव महादेववाडी करण्याच्या हालचाली



**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** राज्यातील सत्ता बदलानंतर शहरांची नावे बदलण्याचे लोण पुण्यातील उपनगरापर्यंत पोहोचले आहे. हडपसर विधानसभा मतदारसंघातील महंमदवाडी या उपनगराचे नाव महादेववाडी करण्याच्या हालचाली शिवसेना गटाकडून सुरू झाल्या आहेत. शिवसेनेचे ( शिंदे गट) विधीमंडळातील मुख्य प्रतोद व रायगडचे आमदार भरत गोगावले यांनी अशी स्पष्ट मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. शिवसेनेचे शहरप्रमुख प्रमोद ऊर्फ नाना भानगिरे यांनी आमदार गोगावले यांच्याकडे ही मागणी केली होती. त्यानुसार गोगावले यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र दिले असून मुख्यमंत्री कार्यालयाकडून यासंदर्भात महापालिकेकडे अभिप्राय मागवण्यात आला आहे. महाविकास आघाडीचे सरकार असताना उस्मानाबादचे नामकरण धाराशिव आणि औरंगाबाद शहराचे नाव छत्रपती संभाजी नगर असे करण्याचा ठराव मंत्रीमंडळाने मंजूर केला होता. शिंदे-फडणवीस सरकार आल्यानंतर मंत्रीमंडळाच्या या ठरावाची तातडीने अंमलबजावणी करण्यात आली. या पार्श्वभूमीवर पुण्यातील एका उपनगराचे नाव बदलण्याच्या हालचाली शिवसेनेकडून सुरू झाल्या आहेत. हडपसर विधानसभा मतदारसंघ हा शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. राज्यातील बदलत्या सत्तासमीकरणात या विधानसभा मतदारसंघातील महंमदवाडी या उपनगराचे नाव महादेववाडी करावे अशी मागणी शिवसेनेचे शहरप्रमुख नाना भानगिरे यांनी सातत्याने केली होती. त्यानुसार त्यांनी आमदार आणि विधीमंडळाचे पतोद भरत गोगावले यांच्याकडे पाठपुरावा केला होता. त्यानुसार त्यांनी महंमदवाडीचे नाव महादेववाडी करावे असे पत्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले आहे. या पत्राची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यालयानेही दखल घेतली असून यासंदर्भात महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी तातडीने अभिप्राय वजा अहवाल द्यावा अशी सूचना केली आहे. दरम्यान हडपसर परिसरातील हंडेवाडी येथे प्रभू श्रीराम यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात येणार आहे. या प्रस्तावाला राज्याच्या नगरविकास विभागानेही सकारात्मक प्रतिसाद दिला होता. हा प्रस्तावही शिवसेनेचे तत्कालिन नगरसेवक विद्यमान शहरप्रमुख नाना भानगिरे यांनीच महापालिका प्रशासनास दिला होता.